माहितीचा अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०३५/२०१७-१८
दि.१७/०३/२०१८.

<u>प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.</u>

श्री.संतोष लोहकरे, ................अपिलार्थी
ई/२०१, सनराईस अपार्टमेंट,
सिध्दीविनायक हॉस्पिटल जवळ,
नवघर रोड, भाईंदर (पूर्व),
जि.ठाणे ४०११०५.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

## -: विवेचन :-

श्री.संतोष लोहकरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.०६/०१/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

1) Provide complete information on action taken by MBMC Mr. Prakash Jadhav.
2) Provide copy of Suspension issued to Mr. Prakash Jadhav by MBMC.

**<u>अपिल दाखल करण्याची कारणे:-</u>**
माहिती अधिकार अंतर्गत चुकीची माहिती दिली असल्याने अपिलार्थी यांनी दि.२८/०२/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**<u>सुनावणीचा तपशिल:-</u>**
अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१७/०३/२०१८ रोजी दुपारी १२.४० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/२३८/२०१८ दि.०५/०३/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **<u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद</u>**:- माझ्या दि.०६/०१/२०१८ रोजीच्या पत्रानुसार मला चुकीची माहिती दिलेली नाही.

२) **<u>जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u>** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात आलेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी अपिलार्थी अर्जदारास हवी असलेली माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत मधील कलम ८(त्र) अन्वये देता येत नसलेबाबत कळविले आहे. तसेच सदर बाबत १७ ऑक्टोबर २०१४ ची शासन परिपत्रकाची प्रत अपिलार्थी अर्जदारास उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सबब, अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.संतोष लोहकरे,
ई/२०१, सनराईस अपार्टमेंट,
सिध्दीविनायक हॉस्पिटल जवळ,
नवघर रोड, भाईंदर (पूर्व),
जि.ठाणे ४०११०५.

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.